# आपण बालकेंद्री होण्याचा प्रयत्न करू या!

लहान मुले, हा समाजघटक, लोकसंख्येच्या सुमारे ३० टक्के इतका आहे. म्हणजे, आज, भारतात सुमारे ३५ ते ४० कोटी एवढी संख्या लहान मुलांची आहे. हा आजवरचा सर्वात दुर्लक्षित आणि बऱ्याच प्रमाणात शोषित असा हा समाजघटक आहे; हे वास्तव आपण लक्षात घेतले पाहिजे. आजचे जग हे प्रामुख्याने 'प्रौढांचे जग' आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. प्रौढांच्या विचारांनी चालणारे आणि अधिक प्रमाणांत प्रौढांचाच, प्रौढांच्या हिताचाच विचार करणारे असे हे प्रौढ जग आहे. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विश्वांत, बालकांच्या गरजांपेक्षाही प्रौढांच्या गरजा भागविण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात असतो. बालकांचे जग आणि प्रौढांचे जग अशी एक दुफळी आज समाजातअस्तित्वात आहे. बालकांचे जग हे दुर्बलांचे जग असल्यामुळे, ते आपल्या हिताचा विचार करू शकत नाही त्यामुळे तो, करण्याची सारी जबाबदारी प्रौढांनाच घ्यायला हवी, पण, इथेच नेमकी अडचण आहे. बालविश्वाची जबाबदारी सर्वस्वी आपली आहे, याची जाणीवच बहुसंख्य प्रौढांना नाही. यामुळेच, किंबहुना, बालकांचे विश्व, त्या विश्वाच्या वयपरत्वे गरजा आणि त्यांच्या प्रगतीच्या वाटा दुर्लक्षितच राहिल्या आहेत.

वास्तविक पाहता, प्रत्येक बालक-बालिकेतून एक प्रौढ व्यक्ती जन्म घेत असते. बाल्यातून प्रौढत्व निर्माण होत असते. पण एवढेच नाही; तर बाल्यावस्था फार ताण-तणावात, हालअपेष्टात जात असेल तर प्रौढ जीवन संपन्न असणे कठीण असते. याउलट, बाल्यावस्था प्रेमाची ऊब आणि सुरक्षित संगोपन देणारी असेल तर ही मुले, प्रौढपणी, जीवनात यशस्वीतेचा अनुभव घेण्याच्या शक्यता अधिक. म्हणून, पुन्हा एकदा असे म्हणता येईल की, बाल्यावस्थेच्या स्वरूपावर प्रौढावस्थेचे स्वरूप ठरत असते. असेही जाणीवपूर्वक म्हणता येईल की, भावी काळातील प्रौढ समाज कसा असावा याची काही संकल्पना, आजच्या प्रौढसमाजासमोर असेल; तर ती साध्य करण्यासाठी आजच्या बालसमाजावर लक्ष केंद्रित करायला हवे. आजच्या प्रौढ समाजाने विचारांनी आणि आचारांनी 'बालकेंद्री' असायला हवे. पुढील काळातील प्रौढ समाज, अधिक ज्ञानी, अधिक कुशल, अधिक नैतिक आणि मानवतावादी असावा असे आपल्याला वाटत असेल तर, विचारात ज्ञानी, कार्यात कुशल, वागणुकीत नैतिक आणि मानवतावादी अशी आपली आजची मुले कशी  घडतील यांवर लक्ष द्यायला हवे.

आपण प्रत्येकानेच, स्वतःच्या बाबतीत बालकेंद्री दृष्टिकोण अंगिकारला तर आणि तरच एवढ्या मोठ्या, व्यापक प्रौढ समाजाला त्या दिशेने वळवू शकू. आपण स्वतः विचारांत आणि आपल्या दैनंदिन व्यवहारांत, बालकेंद्री होण्याचा प्रयत्न करू या!

कोणत्याही प्रौढ व्यक्तीला, बालकेंद्री व्हायचे असेल, पुढील तीन दिशांनी एकाच वेळी प्रयत्न करावे लागतील:

1. आपले बोलणे, बालकांना उत्तेजन देणारे असेल, त्यांना निरुत्साही करणारे नसेल.
2. आपले वागणे, बालकांच्या हिताचे असेल, त्यांच्या अहिताचे नसेल.
3. आपले संबंध, बालकांच्या भावना जपणारे असतील, त्यांच्या भावना दुखावणारे नसतील.

या तीन मुद्यांचा अधिक सविस्तर असा विचार आपण करू या.

### 1. प्रौढांचे मुलांशी असणारे बोलणे

खरे तर, आपण नेहमीच आणि सततच बोलत असतो. बोलणे हेच समाजसंपर्काचे सर्वात प्रभावी साधन असते. पण, आपण, आपले बोलणे हाच आपल्या अभ्यासाचा विषय कधी केला आहे का? आपण आपल्या बोलण्याकडे त्रयस्थपणे कधी पाहतो का? त्याचे विचारपूर्वक अवलोकन करतो का? आपण असे कधी केलेले नसते, करीत नाही हेच खरे!

आपण घरी आपल्या स्वतःच्या आणि बाहेर वेळोवेळी संपर्कात येणाऱ्या इतर मुलांशी काय आणि कसे बोलतो, हे पाहणे अगत्याचे आहे. सार्वत्रिकरित्या पहिले तर प्रौढांच्या बोलण्यात ढोबळमानाने काही दोष आढळतात.

**एक, फार मोठ्याने बोलणे**: अनेक लोक नेहमीच अगदी वरच्या पट्टीत बोलत असतात. ते घरात बोलत असो, शाळेत शिकवीत असो, मोबाईलवर बोलत असो वा रस्त्यावरून जाताना असो, यांची आपली कायमच बोलण्याची वरची पट्टी असते. वास्तविक बोलणाऱ्याने ऐकणारा किती अंतरावर आहे, हे लक्षात घेऊन बोलण्याची पट्टी कमी-जास्त ठेवावी, असा नियम आहे. निदान मुलांच्या बाबतींत तरी हा नियम प्रत्येकाने काटेकोरपणे पाळला पाहिजे. सौम्य आवाजात बोलण्याने, आपले व्यक्तिमत्व उठून दिसतेच, पण आपले असे बोलणे नेहमीच प्रभावी ठरते; ऐकणाऱ्याला आपले बोलणे ऐकावेसे वाटते. मुले तर मोठ्या आवाजाला भितात. किंबहुना, मुलांना भीती वाटावी या उद्देशाने, पालक आणि शिक्षक बोलताना मोठा आवाज काढतात. मुलांना

आपली भीती वाटावी असे वागणे हेच मुळी गैर आहे. तुमची भीती वाटली तर तुमची मुलांशी कधीही मैत्री होऊ शकत नाही. मग आपण बालकेंद्री कसे होणार?

**दोन, फारसे न बोलणे**: अनेक लोक फारसे बोलणारेच नसतात.मुलांशी तर नाहीच नाही. असे पालक आपल्या पाल्यांशीसुद्धा अगदी मोजकेच बोलतात, आणि ते सुद्धा फक्त व्यवहारांपुरते. असे लोक, लहान मुलांशी कधीही मैत्री करू शकत नाहीत. असे पालक आपल्या स्वतःच्या मुलांच्या वाढीचा आणि त्यांच्या टप्प्याटप्प्याने शिकण्याचा आनंदही घेऊ शकत नाहीत. बोलणे आणि मुले हा एक अविभाज्य असा संबंध आहे. मुलांचे बोलणें हे त्यांच्या शिकण्याचे, मेंदूच्या वाढीचे आणि इतरांशी संपर्क ठेवण्याचे साधन आहे. मुले याच साधनाकरवी घरच्या प्रौढांशी संवाद साधू पाहतात. अशा वेळी प्रौढांचा प्रतिसाद महत्त्वाचा आणि आश्वासक ठरत असतो. पालकांचा प्रतिसाद न मिळणे ही गोष्ट, मुलांच्या वाढीतील मोठाच अडथळा ठरतो. मुले स्वतः बोलून, आपल्या विचार, कल्पना, भावना, यांची अभिव्यक्ती करत असतात. पालकांनी, शिक्षकांनी आणि अन्य प्रौढांनी दिलेल्या प्रतिसादांच्या आधारावर मुले या गोष्टींचा विकास साधत असतात. पालक-शिक्षक-अन्य प्रौढ यांचा प्रतिसाद हे बालकांच्या बौद्धिक विकासाचे साधन असते. त्यामुळे, न बोलणाऱ्यांनी सुद्धा बोलले पाहिजे, मुलांना साथ दिली पाहिजे, मुलांची गरज भागविली पाहिजे, मुलांशी मैत्री केली पाहिजे.

**तीन, तुसडेपणाने बोलणे**: माझा अनेक वेळचा अनुभव असा आहे की, केवळ, खेळायला जागा नाही, मैदाने नाहीत म्हणून मुले चक्क रस्त्यांवर खेळतात. अशा वेळी, काही कारण नसताना, रस्त्याने जाणारे-येणारे लोक मुलांवर अनाठायी ओरडतात, त्यांना हाकलू पाहतात. मुलांशी अत्यंत तुसडेपणाने वागतात, बोलतात. रस्त्यात, आपला अजिबात संबंध नसताना, मुलांशी तुसडेपणाने बोलणे, हा वाहतुकीचे नियम मोडण्यापेक्षाही अधिक गंभीर गुन्हा मानला जायला हवा. बऱ्याचदा तरुण मुले-मुली, लहान मुलांशी संपर्क साधण्यात, त्यांच्याशी दोस्ती करण्यात फार मागे असतात. वास्तविक मुलांना, आपल्या वयाच्या नजिकच्या प्रौढांशी बोलण्यात विशेष आनंद वाटत असतो. अशा संधी त्यांना मिळाव्यात असा प्रयत्न व्हायला हवा. लहान मुलांनाही स्वतःचे एक स्वतंत्र व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्व असते. प्रौढांनी कायमच त्याचा सन्मान करायला हवा. बालकेंद्री दृष्टिकोणाची ही पहिली पायरी आहे.

### 2. प्रौढांचे मुलांशी असणारे वागणे :

मुलांशी बोलताना आपली भाषा जशी संयमीत हवी तसेच आपले वागणेही संयमीत असायला हवे. मुलांना आपल्या वाढीच्या काळांत, घरातील प्रौढांची फार मोठी गरज असते. प्रौढांची सतत मदत लागत असते,

अशावेळी ते समजून-उमजून  करणे हे पालकांचे कर्तव्य असते. ‘समजून-उमजून’ मदत करणे, याचा अर्थ असा की, मुलाचे परावलंबित्व लक्षात घेऊन, त्याला आवश्यक त्या वेळी आवश्यक ते सहाय्य करणे; पण आपले सहाय्य आपण लादत तर नाही ना, त्याच्या स्वावलंबनाकडे जाण्याच्या मार्गात आपण अडथळा तर ठरत नाही ना, हेही आवर्जून पाहायला हवे.

आपले अतिरेकी वागणे, मुलांना सतत रागावणे, मारणे, त्यांच्याशी अबोला धरणे अशा गोष्टी मुलांचे कायमस्वरूपी शोषण करणारे, मुलांच्या वाढीला घातक ठरणारे असते. पालकत्वाचे दोन तऱ्हेचे वागणे प्रकर्षाने दिसून येते. काही पालक मुलांच्या वाढीच्या काळात, मुलांकडे, दुर्लक्षच करतात; आणि मग त्यांची मुले, पालकांच्या आवश्यक अशा  सहाय्यालाच मुकतात. तर काही पालक, मुलांवर अति लक्ष ठेवून असतात, त्यांना आपल्या नजरेच्या धाकात ठेवतात. हे दोनही प्रकारचे पालक, अंतिमतः मुलांचे नुकसानच करतात. लहान वय हे मुलांच्या घडणीचे वेगवान वय असते. अशा काळात प्रौढांची वागणूक ही मुलांच्या मेंदूच्या विकासाला पूरक अशी असावी; घातक अशी असू नये, असा एक सर्वसाधारण नियम प्रौढांच्या वागणुकीबाबत सांगता येईल.

**3. प्रौढांकडून मुलांच्या भावनांचे नियमन :**

लहान वयांत मुलांची सगळयात मोठी गरज असते ती त्यांच्या भावना जपल्या जाण्याची. याबाबतींत प्रौढांची जबाबदारी अशी की, त्यांनी मुलांच्या भावना जपण्याचा प्रयत्न करावा, भावना दुखावल्याचा गुन्हा करू नये. लहान मुलांच्या वाढीच्या काळातच, मुलांवर भावनिकतेबाबतचे संस्कार व्हावे लागतात. मुलांना आपल्या भावी काळाची तयारी करून द्यायची असेल तर, त्यासाठी लागणाऱ्या दोन गोष्टींची रुजवण त्यांच्या वृत्तीत व्हावी लागेल. एक म्हणजे,कोणत्याही परिस्थितीत, मुलांना आयुष्यभर आपल्या भावनांचे नियंत्रण करणे, साधले पाहिजे. दुसरे असे की, समाजात वावरताना, कधीही, अन्य संबंधित व्यक्तींच्या भावनांशी जुळवून घेता आले पाहिजे. समाजातील, व्यक्ती-व्यक्तींच्या संबंधांतील बहुतेक प्रश्नांचा उगम हा, ह्या दोन गोष्टींच्या अभावांत आढळतो.

मुलांचे विश्व हे प्रामुख्याने भावनिक विश्व असते. मुलांच्या भावना फार लवकर दुखावतात आणि तितक्याच लवकर त्या ताळयावरही येतात. परंतु या बाबतींत प्रौढांचा हस्तक्षेप महत्त्वाचा असतो. आपल्या बिघडलेल्या भावना सावरण्याचा प्रयत्न मुले आपणहून करतातच; पण प्रौढांच्या मदतीने हे अधिक नेटके आणि लवकर होते. काही वेळेस, मुले दीर्घकालच्या मनाच्या शोषणाने भावनिकदृष्ट्या कोसळण्याची शक्यता असते; अशा

कोसळण्याचे दीर्घकालिक परिणाम मुलांच्या वृत्ती-कृतींवर होण्याची दाट शक्यता असते. हे असे होऊ न देण्याकडे प्रौढांचे बारीक लक्ष असावे लागते.

मुलांच्या भावनिकतेचा आणि त्यांच्या बौद्धिक कामांचा घनिष्ठ संबंध असतो. कोणत्याही एकाग्रतेने करावयाच्या बौद्धिक कामासाठी, म्हणजे अभ्यास करण्यासाठी भावनिक स्थिरतेची गरज असते. ही गोष्ट मुलांना कळत नाही, तर ती नजीकच्या प्रौढांना कळावी लागते. त्यासाठी प्रौढांनाच प्रयत्न करावे लागतात.

समाजातील शिक्षकवर्ग आणि पालकवर्ग हे दोन लहान मुलांच्या विश्वातील, केवळ जवळचेच नव्हे तर आपला प्रभाव पाडणारे वर्ग असतात. त्यांचे ‘बालकेंद्री’ होणे हे घर आणि शाळा दोन्हींचेही वातावरण सौहार्दपूर्ण होण्यास आणि बालस्नेही होण्यास उपयुक्त ठरणारे आहे.

❖